फौ.कि.अर्ज क्र.१५४/२०२२

महेश -वि- प्रेमा, **नि.क्र.२३**

**<u>अर्जदार तर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – विनोद केशवराव लाटेलवार

वय. ४३ वर्षे, व्यवसाय – नोकरी, राह. – तुमसर, ता. तुमसर, जिल्हा – भंडारा.

**<u>सरतपासणी अर्जदारा तर्फे विधीज्ञ श्री. व्ही.आर. माटे यांच्या मार्फत –</u>**

मी शाखा व्यवस्थापक म्हणुन भारतीय स्टेट बँक शाखा तुमसर येथे ०५.०७.२०२३ पासुन कार्यरत आहे. मला या प्रकरणातील न्यायालयीन साक्ष समंस प्राप्त झाले आहे. साक्ष समंस आदेशीत केल्याप्रमाणे गैरअर्जदाराच्या खात्याचे विवरणपत्र मी सोबत आणलेले आहे. आता मला दस्त यादी निशाणी १७ प्रमाणे दाखल असलेले अनु.क्र. १ वरील विवरणपत्र दाखविण्यात आले. सदरचे विवरणपत्र आमच्या शाखेमार्फत जारी करण्यात आले होते. मी सोबत आणलेल्या विवरणपत्रातील व अभिलेखावर दाखल विवारणपत्रातील मजकुर बरोबर आहे. त्यावर आमचे सर्वीस मॅनेजर यांची सही असुन ती मी ओळखतो. त्यास **निशाणी २४** देण्यात येते.

२. सदर खात्यातील नोंदीप्रमाणे दर महिन्याला ११,६२५/– रूपये एवढी रक्कम जमा होत असते ती नगरपरिषद, तुमसर यांचे कडुन जमा होत असते. ती रक्कम कशाही जमा होते ते मला माहिती नाही. परंतु पगार किंवा पेंशनची रक्कम असावी.

**सरतपास पुर्ण.**

**<u>गैरअर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. डी.पी. रावलानी यांचा पुकारा केला असत गैरहजर. करीता उलटतपास नाही.</u>**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (आर. पी. बाठे) | (आर. पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. ०२.०६.२०२६ | दि. ०२.०६.२०२६ |